




RNI NO-MAHMAR/2022/90217

दैनिक जनसंचलन
निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!

संपादक : जितेंद्र कायस्थ
Email- jansanchlan@gmail.com
Mob- 9822720784








वर्ष ३ रे अंक : २३५ वा बुधवार दि १२ नोव्हेंबर २०२५ पृष्ठ ८ किंमत ३ रुपये


# राज्याच्या आरोग्य खात्यात कासवापेक्षाही सुस्त कामकाज?

## चौकशी अहवालात दोषी आढळूनही भ्रष्टाचाऱ्यांवर कोणतीही कारवाई नाही

**जनसंचलन/बुलढाणा**

एकीकडे राज्यातील महायुतीचे सरकार गतिमानतेचे ढोल पीटत असते, मात्र दुसरीकडे राज्याच्या आरोग्य विभागाचे कामकाज कासवापेक्षाही संथ गतीने सुरू असल्याचे स्पष्ट दिसत आहे. तसेच भ्रष्टाचाऱ्यांना आरोग्य विभागात प्रचंड प्रमाणात अभय मिळत असल्याचे दिसत आहे. येथील जिल्हा रुग्णालयातील भ्रष्टाचार प्रकरणी अहवालात दोषी आढळून आणि भ्रष्टाचारी अधिकाऱ्याची संपत्ती जप्त करण्याचे आदेश देऊनसुद्धा कोणाही भ्रष्टाचाऱ्यावर कोणतीच कारवाई होत नसल्याचे दिसत आहे. यावरून राज्याच्या आरोग्य विभागात भ्रष्टाचाऱ्यांचा दबदबा किती आहे, हेही उघड होते आहे. येथील जिल्हा सामान्य रुग्णालयात गेल्या अनेक वर्षांपासून कशाप्रकारे प्रचंड प्रमाणात भ्रष्टाचार बोकाळला आहे, याविषयी सिटी न्यूज व दैनिक जनसंचलनच्या वतीने यापूर्वी सातत्याने वृत्तमालिका प्रकाशित करून प्रकाश टाकण्याचा प्रयत्न केला आहे. येथील जिल्हा सामान्य रुग्णालयात कोरोना महामारीच्या आधीपासूनच भ्रष्टाचार बोकाळला होता. परंतु महामारीच्या काळात तर या भ्रष्टाचाराला प्रचंड ऊत आला. महामारीच्या नावाखाली या ठिकाणी प्रचंड प्रमाणात अव्वाच्या सव्वा दराने उपकरणे व औषधांची खरेदी करण्यात आली.या संपूर्ण भ्रष्टाचाराच्या गटारगंगेत आजवर अनेक अधिकाऱ्यांनी आपले भ्रष्ट हात धुवून घेण्याचा प्रयत्न केला. या भ्रष्टाचाराचे शिरोमण ठरले ते वादग्रस्त भांडारपाल प्रकाश नामदेव बोथे हल्ली मुक्काम गोरक्षण रोड परिसर अकोला कारण बोथे यांनी या ठिकाणी आलेल्या विविध प्रकारच्या जिल्हा शल्यचिकित्सकांच्या कार्यकाळात बेबंदपणे भ्रष्टाचार केला. या ठिकाणी येऊन गेलेले डॉ. नितीन तडस, डॉ. पंडित व प्रभारी या जिल्हा शल्यचिकित्सकांच्या काळातही भ्रष्टाचाराची गाथा काही केल्या खंडित झाली नाही आणि जिल्हा सामान्य रुग्णालयात शेकडो कोटींचा घोटाळा होत राहिला. महामारीच्या काळात व त्यानंतरही प्रचंड प्रमाणात उपकरणे व औषधांची खरेदी दाखवण्यात आली. मात्र, ही उपकरणे आणि औषधे कधीच जिल्हा सामान्य रुग्णालयात पोहोचली नाहीत आणि त्याचा लाभ हा गरजू व गोरगरीब रुग्णांना मिळाला नाही. बहुचर्चित भांडारपाल प्रकाश नामदेव बोथे हल्ली मुक्काम गोरक्षण रोड परिसर अकोला यांची खरे तर लायकी नसतानाही त्यांना भांडारपाल पदावर






बसवण्यात आले. प्रकाश बोथे यांनी इतका बेशरमपणे आणि निर्लज्जपणे भ्रष्टाचार केला की, जेंव्हा या भ्रष्टाचाराची चौकशी करण्यात आली, त्या वेळी चौकशी समितीतील सदस्यांचेही त्यांचा भ्रष्टाचार पाहून डोळे विस्फारून गेले होते. बुलढाणा जिल्हा सामान्य रुग्णालयात आजवर जो काही भ्रष्टाचार झाला, त्याचा आकडा वेगवेगळ्या सूत्रांनुसार ३०० कोटी किंवा त्याहूनही अधिक आहे. यावरूनच या भ्रष्टाचाराची व्याप्ती आपल्याला माहिती पडू शकते. दैनिक जनसंचलन व सिटी न्यूजने सातत्याने या भ्रष्टाचारावर आसूड ओढण्याचे काम केले. एव्हढेच नाही तर या भ्रष्टाचाराचे पुरावे राज्याचे आरोग्य मंत्री, आरोग्य खात्यातील वरिष्ठ अधिकारी, लोकप्रतिनिधी या सर्वांना दिले. या भ्रष्टाचाराची इत्थंभूत माहिती राज्याच्या लाचलुचपत प्रतिबंधक विभागालाही दिली. सामाजिक कार्यकर्ते चंद्रकांत खरात यांनीही सातत्याने शासनाकडे व वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे भ्रष्टाचाराचे प्रकरण लावून धरले होते. या सर्वांच्या दबावामुळे अखेर चौकशी समिती बसवण्यात आली. या चौकशी समितीने वारंवार बोलावून देखील भांडारपाल प्रकाश बोथे हे कधीही सामोरे गेले नाहीत. यावरून बोथे यांचा माजोर्डेपणा उघड होतो. चौकशी समितीने तात्काळ बोथे यांच्यावर फौजदारी कारवाई करणे तसेच शासनाला कोट्यवधी रुपयांचा चुना लावल्या बद्दल त्यांची चल अचल संपत्ती जप्त करून ती लिलाव करा आलेले ते पैसे शासन तिजोरीत जमा करण्याचे आदेश दिले होते. मात्र तेंव्हापासून सातत्याने केवळ कागदी घोडे नाचवण्याचे काम आरोग्य विभागात सुरू आहे. वारंवार पाठपुरावा करून देखील काही होत नसल्याने खरात यांनी परत या प्रकरणी तक्रार दिली होती. त्यानंतर काही दिवसांपूर्वी राज्याच्या सामान्य प्रशासना विभागाच्या वतीने पुन्हा एकदा आरोग्य विभागाला पत्र पाठवण्यात आले. यावरून हे स्पष्ट आहे की, राज्य सरकारमध्ये केवळ कागदी घोडे पळवण्याचा खेळ चालतो. या ठिकाणी भ्रष्टाचाऱ्यांवर कोणतीही कारवाई होत नाही. एकीकडे राज्याचे मुख्यमंत्री-उपमुख्यमंत्री भ्रष्टाचारमुक्त शासन देण्याच्या वल्गना करतात, तर दुसरीकडे अशाप्रकारे भ्रष्टाचाऱ्यांना वाचवण्याचे काम शासनाकडून होत आहे.बोथे यांची चल अचल संपत्ती जप्त करण्याचे आदेश देऊन आता तब्बल पावणे दोन वर्षे होत आलेले आहेत, परंतु अद्याप ना आरोग्य विभागाने कोणतीही हालचाल केली ना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडून कोणतीही कारवाई करण्यात आली. जिल्हा रुग्णालयातील भ्रष्टाचार आता स्वच्छपणे सूर्यप्रकाशात आलेला असताना देखील आरोग्य विभाग किंवा लाचलुचपत प्रतिबंधक विभाग आता नेमक्या कोणत्या मुहुर्ताची वाट पाहतो आहे, हे कळण्यास मार्ग नाही. यावरून स्पष्ट आहे की, राज्याच्या आरोग्य विभागात केवळ भ्रष्टाचाऱ्यांची चलती आहे. भ्रष्टाचाऱ्यांना वाचवा आणि भ्रष्टाचार जिरवा, हे एकमेव धोरण सध्या या ठिकाणी सुरू आहे. इतके वाईट चित्र राज्य शासनात असले, तरी जनतेप्रति असलेली बांधिलकी म्हणून दैनिक जनसंचलन व सिटी न्यूज सातत्याने याविरोधात आवाज उठवत राहणार आहे. जोपर्यंत बोथे डॉ. तडस, डॉ. पंडितसह प्रभारी व इतर यांच्यावर कारवाई होत नाही, तोपर्यंत ही मोहीम अशीच सुरू राहणार आहे.

अजून बरेच काही पुढील भागात

## शेतीच्या वादातून खून नऊ आरोपींना अटक दोन्ही बाजूंनी परस्परविरोधी तक्रारी : आरोपींना कोठडी

**जनसंचलन/ डोणगाव**

मेहकर तालुक्यातील नागापूर (अंजनी बु, शिवार) येथे सोमवारी (दि. १०) शेतीच्या वादातून झालेल्या हाणामारीत एकाचा मृत्यू, दोन गंभीर जखमी आणि सहा जखमी झाले होते. या प्रकरणात डोणगाव पोलिसांनी नऊ जणांना अटक करून न्यायालयात हजर केले असता न्यायालयाने त्यांना दोन दिवसांची पोलिस कोठडी सुनावली आहे. या प्रकरणात दोन्ही बाजूंनी परस्परविरोधी तक्रारी नोंदविण्यात आल्या आहेत. या प्रकरणात पहिली तक्रार विकार खां जाबीर खां पठाण (१८, रा. मंगरूळ नवघरे, ता. चिखली) यांनी डोणगाव पोलिसात केली. त्यानुसार, ते आई-वडील आणि नातेवाइकांसह अंजनी बु शिवारातील शेतात गेले असता, सय्यद नोव्हेंबर रोजी सायंकाळी झाली होती हाणामारी मंजूर सय्यद बिराम व त्याचे साथीदारांनी हल्ला केला. या हल्ल्यात फिर्यादीचे फुफा सय्यद अयाज सय्यद वाहेद यांच्या डोक्यावर वार झाल्याने त्यांचा जागीच मृत्यू झाला, तर काही जखमी झाले. या प्रकरणात पोलिसांनी सय्यद मंजूर सय्यद बिरामसह त्याचे आठ साथीदारांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. आरोपींमध्ये सय्यद आसिफ, सय्यद समीर, सय्यद रहीम, सय्यद इमरान, सय्यद रफिक, अरेफाबी, फरीदाबी आणि सुलतानाबी या नऊ जणांचा समावेश आहे. या घटनेनंतर विरोधी गटाकडूनही प्रत्युत्तरार्थ तक्रार नोंदविण्यात आली आहे. सय्यद कुटुंबातील दहाजणांनी



मारहाण केली. या तक्रारीवरून पोलिसांनी विकार खां पठाण व त्याच्या नातेवाइकांसह दहाजणांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

# शिष्यवृत्तीची इयत्ता कोणती ?

## संपादकीय लेख

राज्यातील प्राथमिक आणि माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षांची इयत्ता पुन्हा बदलण्याचा निर्णय, आपल्या शिक्षण व्यवस्थेतील धोरणसातत्याचा अभाव अधोरेखित करणारा आहे. संबंधित मंत्री आणि अधिकारी यांच्या मनात आल्यानंतर त्यांनी निर्णय घ्यावा आणि लाखो विद्यार्थ्यांच्या तो माथी मारावा, हा प्रकार काही नवीन नाही; परंतु शिक्षणासारख्या महत्त्वाच्या क्षेत्रात निर्णय घेताना विद्यार्थ्यांचा आधी विचार करावा, असे सर्वोच्च न्यायालयाने वेळोवेळी सांगूनही त्याचा संबंधितांवर फारसा परिणाम होत नाही, हेच खरे. मूळचा निर्णय बदलून नवा आदेश जारी करायचा आणि तद्नंतर पुन्हा मूळचा निर्णय लागू करायचा, असा प्रकार शिक्षणाबाबत सातत्याने होत आहे. दहावीच्या परीक्षेत अंतर्गत गुण रद्द करणे आणि पुन्हा लागू करणे, शालेय पाठ्यपुस्तकात कोरी पाने ठेवणे आणि ते नंतर काढून टाकणे, अशा निर्णय फिरविणाऱ्या अनेक घटनांची मालिकाच गेल्या काही वर्षांत दिसते. यातून आपल्या शिक्षणविषयक धोरणातील धरसोडपणा, लहरीपणा दिसतो. याचा विद्यार्थ्यांवर मोठा परिणामही होतो; मात्र शिक्षणाच्या केंद्रस्थानी असलेल्या या घटकाचा विचार फारसा होत नाही. विद्यार्थी हा केवळ भाषणांपुरता शिक्षणाच्या केंद्रस्थानी असतो. नवे निर्णय घेतले जाऊ नयेत किंवा आधीची व्यवस्था बदलली जाऊ नये, असा याचा अर्थ नाही. मात्र, कोणताही निर्णय घेण्याच्या आधी त्याच्या शैक्षणिक गुणवत्तेचा, त्यामागील हेतूंचा आणि विद्यार्थ्यांवरील परिणामाचा अभ्यास करायला हवा. आधीची एखादी पद्धत बंद करतानाही अशाच प्रकारे अभ्यास व्हायला हवा. सध्या पाचवी आणि आठवी या इयत्तांसाठी शिष्यवृत्ती परीक्षा घेतली जाते. नव्या निर्णयानुसार, यंदाच्याच शैक्षणिक वर्षापासून चौथी आणि सातवी या इयत्तांसाठी ही परीक्षा घेतली जाईल. वास्तविक अशा प्रकारचे निर्णय शैक्षणिक वर्षाच्या सुरुवातीला जाहीर होणे अपेक्षित असते. म्हणजे त्यानुसार विद्यार्थ्यांना तयारी करता येऊ शकते. शिष्यवृत्तीच्या इयत्ता बदलण्याचा निर्णय मात्र चालू शैक्षणिक वर्षाच्या मध्यात जाहीर करण्यात आला आहे. पाचवी आणि सातवी या वर्गांतील शिष्यवृत्ती देऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांना या परीक्षेची कल्पना होती. त्यांपैकी काहींनी त्यांचा अभ्यासही सुरू केला असेल. मात्र, चौथी आणि सातवी या इयत्तांतील शिष्यवृत्ती परीक्षा देऊ इच्छिणारे, आपल्यासाठी ही परीक्षा पुढील वर्षी असणार या समजुतीत असणार. त्यांना ही परीक्षा आता याच शैक्षणिक वर्षात द्यावी लागणार. त्यामुळे साहजिकच त्यांना तयारीसाठी वेळ कमी मिळणार. विद्यार्थी हाच शिक्षणाचा केंद्रबिंदू असेल, तर हा निर्णय शैक्षणिक वर्षाच्या सुरुवातीला का जाहीर केला नाही, हा प्रश्न म्हणूनच महत्त्वाचा ठरतो. शिष्यवृत्तीसाठी इयत्ता बदलण्याचा हा निर्णय कोणत्या समितीच्या शिफारशीनंतर करण्यात आला, ही समिति कधी नेमली गेली होती, किंवा यासाठी कोणता अभ्यास केला गेला, असे प्रश्न निर्माण होतात. शिक्षण खात्याने या प्रश्नांची उत्तरे द्यायला हवीत. इयत्ता बदल करण्यामागील कारणमीमांसा होणे गरजेचे आहे. वास्तविक, दहा वर्षांपूर्वीपर्यंत चौथी आणि सातवी याच इयत्तांसाठी शिष्यवृत्ती परीक्षा होत. त्या वेळी राज्यभरातून सुमारे २२ लाख विद्यार्थी या परीक्षा देत. ही परीक्षा सर्व विद्यार्थ्यांना बंधनकारक नसली, तरी आपल्या विद्यार्थ्यांनी ती द्यावी यासाठी शाळा प्रयत्नशील असत. विशेषत: स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळा यासाठी अधिक



पुढाकार घेत. स्पर्धा परीक्षांच्या आजच्या काळात शिष्यवृत्ती परीक्षांकडे त्यांची प्राथमिक पायरी म्हणूनही पाहिले जात असे. शिक्षण हक्क कायद्याची अंमलबजावणी सुरू झाल्यानंतर प्राथमिक स्तर पाचवीपर्यंत आणि उच्च प्राथमिक स्तर आठवीपर्यंत वाढविण्यात आला. त्यामुळे शिष्यवृत्ती परीक्षा चौथी आणि सातवी यांऐवजी पाचवी आणि आठवी या इयत्तांना घेण्याचा निर्णय झाला. त्यानंतर मात्र या परीक्षांभोवती असलेले वलय कमी होत गेले. या परीक्षा देणाऱ्यांची संख्याही रोडावत गेली. परीक्षार्थींची संख्या सहा ते सात लाखांपर्यंत खाली गेली. आपल्याकडील अनेक प्राथमिक शाळा चौथीपर्यंतच असल्याने अन् खासगी शाळांत शिष्यवृत्ती परीक्षांकडे दुर्लक्ष केले जात असल्याने विद्यार्थ्यांची संख्या कमी होत गेल्याचे सांगण्यात येते. ती पुन्हा वाढवावी यासाठी पूर्वीप्रमाणे चौथी आणि सातवी या इयत्तांसाठी परीक्षा घेण्याचा निर्णय झाल्याचे सांगण्यात येत आहे. व्यवस्थित अभ्यास करून शैक्षणिक वर्षाच्या सुरुवातीला तो जाहीर केला असता, तर विद्यार्थ्यांना आणि त्यांच्या शिक्षकांना व पालकांना व्यवस्थित नियोजन करता आले असते. यापुढे तरी असे होणार नाही, याची काळजी घ्यायला हवी




The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue Court. 9822720784.
(RNI NO-MAHMAR/2022/90217) Email- jansanchlan@gmail.com

# नागपूर महापालिका निवडणुकीची आरक्षण सोडत जाहीर, मुख्यमंत्र्यांच्या शहरात कसं आहे चित्र?

**नागपूर :** शहरात बहुप्रतिक्षित नागपूर महानगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणुकीची प्रक्रिया आता गतीमान झाली आहे. नगर परिषद आणि नगर पंचायत निवडणुका जाहीर झाल्यानंतर मंगळवारी नागपूर महानगरपालिकेच्या आरक्षण सोडतीची प्रक्रिया कविवर्य सुरेश भट सभागृहात पार पडली. यामुळे आता नागपूर मनपा निवडणुकीच्या रंगतदार लढतीला औपचारिक सुरुवात झाली आहे.

महानगरपालिकेकडून मिळालेल्या माहितीनुसार, नागपूर मनपामध्ये एकूण १५१ नगरसेवक निवडून येणार आहेत. शहरात ३८ प्रभाग असून, त्यापैकी ३७ प्रभागांत प्रत्येकी चार सदस्य आणि ३८ क्रमांकाच्या प्रभागात तीन सदस्य असतील. एकूण जागांपैकी ५० टक्के म्हणजेच ७६ जागा महिला उमेदवारांसाठी राखीव ठेवण्यात आल्या आहेत. त्यामुळे या निवडणुकीत ७६ नगरसेविका आणि ७५ नगरसेवक असे स्वरूप पाहायला मिळणार आहे.आरक्षण सोडतीमध्ये अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, इतर मागासवर्ग (ओबीसी) तसेच सर्वसाधारण महिला या वर्गांसाठी आरक्षण निश्चित करण्यात आले. सोडतीनुसार प्रभाग क्रमांक १५ आणि प्रभाग क्रमांक १९ या दोन्ही प्रभागांमध्ये ओबीसी प्रवर्गासाठी प्रत्येकी दोन जागा राखीव ठरवण्यात आल्या




आहेत. या निर्णयाचे स्वागत करत ओबीसी समाजाने समाधान व्यक्त केले असून, स्थानिक पातळीवर राजकीय हालचालींना देखील वेग आला आहे.सोडतीनुसार नागपूर महानगरपालिकेत सर्वसाधारण प्रवर्गाच्या ६९, इतर मागासवर्ग प्रवर्गाच्या ४०, अनुसूचित जातींच्या ३० आणि अनुसूचित जमातींच्या १२ जागा असतील. त्यात महिला उमेदवारांसाठी आरक्षणाचा समावेश आहे. या सोडतीमुळे कोणत्या प्रभागातून कोणत्या वर्गाचे उमेदवार निवडणुकीत उतरतील, हे चित्र आता स्पष्ट झाले आहे. परिणामी, माजी नगरसेवक आणि नवोदित इच्छुक यांच्याकडून आगामी निवडणुकीच्या तयारीला वेग आला आहे.महानगरपालिकेकडून जाहीर करण्यात आलेल्या वेळापत्रकानुसार, आरक्षणाचे प्रारूप सोमवार, १७ नोव्हेंबर २०२५ रोजी प्रसिद्ध केले जाणार आहे. नागरिकांना या प्रारूपाबाबत सूचना आणि हरकती सादर करण्यासाठी १७ ते २४ नोव्हेंबर दुपारी ३ वाजेपर्यंतची मुदत देण्यात आली आहे.

नागरिकांनी आपल्या हरकती किंवा सूचना महापालिकेच्या मुख्यालयात, निवडणूक कार्यालयात किंवा संबंधित प्रभाग कार्यालयात प्रत्यक्ष सादर कराव्यात, असे आवाहन महापालिकेने केले आहे.

या प्रक्रियेनंतर अंतिम आरक्षण यादी प्रसिद्ध केली जाणार असून त्यानंतर निवडणुकीच्या तारखांची घोषणा अपेक्षित आहे. सोडतीनंतर शहराच्या राजकीय वर्तुळात चर्चांना उधाण आले आहे. विविध पक्षांनी आरक्षणाच्या प्रारूपावर लक्ष केंद्रित केले असून आगामी निवडणुकीसाठी रणनीती आखण्यास सुरुवात केली आहे. आठ वर्षांच्या प्रतीक्षेनंतर होणाऱ्या या निवडणुकीकडे नागपूरकरांचे लक्ष लागले असून, आरक्षण सोडतीनंतर शहरातील राजकारणाची रंगत अधिकच वाढली आहे.

## अखेर दोन्ही राष्ट्रवादी एकत्र, युतीत लढण्याचा निर्णय

**कोल्हापूर :** सध्या राज्यातील राजकीय वातावरण पाहिलं, तर कुठे फूट पडून एकाचे दोन पक्ष झाले आहेत, तर कुठे एकाच पक्षात गटातटाचं राजकारण सुरु आहे. तरीही आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका पाहता परिस्थितीनुसार काही ठिकाणी दोन पक्ष एकत्र येण्याची चिन्हं दिसत आहेत. अशीच परिस्थिती कोल्हापूर जिल्ह्यातील चंदगड नगरपंचायत निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याकडे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची धुरा आहे, तर दुसरा पक्ष राष्ट्रवादी काँग्रेस : शरदचंद्र पवार या नावाने ओळखला जातो. मात्र कोल्हापुरात राष्ट्रवादी काँग्रेसच्या या दोन्ही गटांमध्ये ऐतिहासिक एकीचा निर्णय घेण्यात आला आहे.डॉ. नंदाताई बाभुळकर (शरद पवार गट) आणि माजी आमदार राजेश पाटील (अजित पवार गट) यांनी एकत्र येऊन 'राजर्षी शाहू विकास आघाडी'च्या नावाखाली निवडणुका युती करुन लढवण्याचा निर्णय घेतला आहे, अशी माहिती गडहिंग्लज येथे पत्रकार परिषदेत मंत्री हसन मुश्रीफ यांनी दिली आहे. ही युती खास मंत्री हसन मुश्रीफ यांच्या नेतृत्त्वाखाली झाली आहे.

## राऊतांसाठी एकनाथ शिंदेंचा फोन

**मुंबई :** महाराष्ट्रात राजकीय संस्कृतीची एक परंपरा राहिलेली आहे. राजकारणात कितीही परस्परांचे प्रतिस्पर्धी किंवा विरोधक राहिले तरी वेळप्रसंगी वैयक्तिक संबंध जोपासायचे, अशी राजकीय संस्कृतीची महाराष्ट्राला मोठी परंपरा राहिलेली आहे. शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे आणि ज्येष्ठ नेते शरद पवार यांच्यातील नातं आपल्या सर्वांना माहिती आहे. अशी अनेक उदाहरण देता येतील. पण आजच्या काळात ही राजकीय संस्कृती अद्यापही आहे का? असा प्रश्न पडत असताना, या राजकीय संस्कृती दर्शवणारी घटना समोर आली आहे. राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी खासदार संजय राऊत यांची फोन करुन तब्येतीची विचारपूस केली आहे. तसेच संजय राऊत यांना लवकर बरे होण्यासाठीदेखील शुभेच्छा दिल्या आहेत.शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे खासदार संजय राऊत यांची प्रकृती बिघडली आहे. संजय राऊत यांनी स्वत: काही दिवसांपूर्वी ट्विट करत याबाबत



माहिती दिली होती. संजय राऊत यांनी आपल्याला बरे होण्यासाठी दोन महिन्यांचा कालावधी लागेल, असं सांगितलं आहे. दरम्यान गेल्या आठवड्यात संजय राऊत यांना प्रकृती बरी नसल्यामुळे रुग्णालयात दाखल करण्यात आलं होतं. यानंतर आता त्यांना रुग्णालयातून डिस्चार्ज मिळाल्याची माहिती आहे.संजय राऊत यांची प्रकृती बिघडल्यानंतर अनेकांनी त्यांची प्रकृती लवकर बरी व्हावी यासाठी प्रार्थना केली होती. देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ट्विट करत संजय राऊत यांना लवकर बरे होण्यासाठी सदिच्छा दिल्या होत्या. तसेच आता राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी फोन करुन संजय राऊत यांच्या प्रकृतीची विचारपूस केल्याची माहिती समोर आली आहे.

## ५ मतांचा विषय काढत नेत्याचा राजीनामा

**पाटणा :** एकीकडे एक्झिट पोलचे आकडे राज्यात एनडीएला यश मिळेल, असा अंदाज वर्तवत असताना काँग्रेसच्या दिग्गज नेत्यानं राजीनामा दिला आहे. बिहार काँग्रेसचे अध्यक्ष राहिलेल्या शकील अहमद यांनी पक्षाचा राजीनामा दिला आहे. राजीनामा देताना त्यांनी एक लांबलचक पत्र लिहिलं आहे. 'मी १६ एप्रिल २०२३ रोजी लिहिलेल्या पत्राचं स्मरण करा. भविष्यात कोणतीही निवडणूक लढायची नाही ही बाब मी पक्षाला आधीच कळवली होती. माझी तिन्ही मुलं कॅनडात स्थिरस्थावर झाली असून त्यांना राजकारणात रस नसल्याचं मी नुकतंच सांगितलं होतं. त्यामुळे ते निवडणूक लढण्याची शक्यता शून्य आहे. पण तरीही आजन्म काँग्रेसमध्ये राहीन असं मी म्हणालो होतो. पण अध्यक्ष महोदय आता ते शक्य नाही,' असं शकील अहमद यांनी पत्रात नमूद केलं आहे.'मी अतिशय भावुक मनानं काँग्रेस पक्षाच्या सदस्यत्वाचा राजीनामा देत आहे.

## बिहारमध्ये अब की बार किसकी सरकार? एक्झिट पोलचे आकडे समोर

**पाटणा :** बिहार राज्यात रेकॉर्डब्रेक मतदान झालं. मतदान संपताच एक्झिट पोलचे आकडे समोर आले आहेत.मॅटराइझच्या एक्झिट पोलनुसार एनडीएला १४७ ते १६७ जागा मिळण्याचा अंदाज आहे. तर महागठबंधनला ७० ते ९० जागा मिळू शकतात. अन्य पक्षांना २ ते ६ जागा मिळण्याची शक्यता आहे. भाजपला ६५ ते ७३, जेडीयूला ६७ ते ७५, लोकजनशक्ती पक्षाला ७ ते ९, हिंदुस्तानी अवाम मोर्चाला ४ ते ५ , तर राष्ट्रीय लोक मोर्चाला १ ते २ जागा मिळण्याचा अंदाज आहे.महागठबंधनमध्ये राष्ट्रीय लोक दलाला ७५ ते ९० जागा मिळण्याचा अंदाज आहे. एनडीएला ४८ टक्के, तर महागठबंधनला ३७ टक्के मतं मिळण्याचा अंदाज आहे. निवडणूक रणनीतीकार प्रशांत किशोर यांच्या जन सुराज पक्षाला ५ टक्के, तर असदुद्दीन ओवेसी यांच्या एमआयएमला १ टक्के मतं मिळण्याची शक्यता आहे.पीपल पल्सच्या एक्झिट पोलनुसार एनडीएला



१३३ ते १५९ जागांसह स्पष्ट बहुमत मिळण्याचा अंदाज आहे. तर महागठबंधनला ७५ ते १०१ जागा मिळू शकतात. जन सुराज पक्षाला ० ते ५ जागांवर यश मिळू शकतं. तर अन्य पक्षांना २ ते ८ जागा मिळण्याची शक्यता आहे. एनडीएला ४६.२ टक्के मतं मिळण्याचा अंदाज आहे. तर महागठबंधनला ३७.९ टक्के, जनसुराजला ९.७ टक्के मतं मिळण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे.बिहारमध्ये विधानसभेच्या २४३ जागा आहेत. सत्ता स्थापनेसाठी १२२ जागा जिंकण्याची गरज आहे. २०२० मध्ये झालेल्या निवडणुकीत भाजप प्रणित एनडीएला काठावरचं बहुमत मिळालं होतं.

# पहिल्या मंत्रिमंडळ बैठकीत फडणवीस सरकारने कोणते ५ निर्णय घेतले?

**मुंबई :** राज्यात नगरपालिका आणि नगरपंचायतीच्या निवडणुकांची घोषणा होण्याआधी मागील आठवड्यात झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत राज्य सरकारने निर्णयांचा धडाका लावत तब्बल २१ निर्णय घेतले होते. मागील मंगळवारी झालेल्या या मंत्रिमंडळ बैठकीनंतर काही तासांतच राज्य निवडणूक आयोगाची पत्रकार परिषद झाली आणि स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर करण्यात आला. त्यामुळे राज्यात निवडणूक आचारसंहिता लागली असून या आचारसंहितेच्या काळात आज पहिली मंत्रिमंडळ बैठक पार पडली. या मंत्रिमंडळ बैठकीत पाच महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले आहेत.मंत्रिमंडळाने विविध विभागांतील महत्त्वाच्या निर्णयांना मंजुरी दिली आहे. यामध्ये नाशिक, नागपूर आणि धाराशिव जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांना ८२७ कोटी रुपयांचं शासकीय



भागभांडवल देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. तसंच, न्यायालयीन संकुले आणि न्यायाधीशांच्या निवासस्थानांच्या सुरक्षेत वाढ करण्यासाठी महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळाकडून अतिरिक्त सुरक्षारक्षक घेण्याला व त्यासाठी लागणाऱ्या खर्चास मान्यता मिळाली आहे. पाचव्या महाराष्ट्र वित्त आयोगाच्या अहवालाच्या अंमलबजावणीचा कालावधी १ एप्रिल २०२५ ते ३१ मार्च २०२६ पर्यंत वाढवण्यात आला आहे. यासोबतच, हिंगोली जिल्ह्यातील डिग्रस साठवण तलाव प्रकल्पासाठी ९० कोटी ६१ लाख रुपये आणि सुकळी साठवण तलाव प्रकल्पासाठी १२४ कोटी ३६ लाख रुपयांच्या तरतुदींनाही मंजुरी देण्यात आली आहे.सहकार विभागांतर्गत, नाशिक, नागपूर आणि धाराशिव या जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांना आर्थिक बळ देण्यासाठी ८२७ कोटी रुपयांचं शासकीय भागभांडवल उपलब्ध करून देण्याचा निर्णय मंत्रिमंडळाने घेतला आहे. यामुळे या बँकांना अधिक सक्षमपणे काम करता येईल.विधि व न्याय विभागाच्या संदर्भात, राज्यातील न्यायालयीन संकुले आणि न्यायाधीशांची निवासस्थाने अधिक सुरक्षित केली जाणार आहेत. यासाठी महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळाच्या माध्यमातून अतिरिक्त सुरक्षारक्षक नेमले जातील. या सुरक्षारक्षकांच्या नियुक्तीसाठी आणि त्यांच्या वेतनावरील खर्चासाठी आवश्यक असलेल्या तरतुदींनाही मंत्रिमंडळाने हिरवा कंदील दाखवला आहे.वित्त विभागाने पाचव्या महाराष्ट्र वित्त आयोगाच्या अहवालाच्या अंमलबजावणीचा कालावधी वाढवण्यास मान्यता दिली आहे. हा वाढवलेला कालावधी १ एप्रिल २०२५ पासून सुरू होऊन ३१ मार्च २०२६ पर्यंत लागू राहील. यामुळे आयोगाच्या शिफारशींची अंमलबजावणी सुरळीतपणे पार पडण्यास मदत होईल.

हिंगोली जिल्ह्यातील डिग्रस येथे नवीन साठवण तलाव प्रकल्प उभारण्यासाठी ९० कोटी ६१ लाख रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. त्याचबरोबर, हिंगोली जिल्ह्यातील सेनगाव तालुक्यातील सुकळी येथेही साठवण तलाव प्रकल्प उभारण्यासाठी १२४ कोटी ३६ लाख रुपयांच्या खर्चास मंजुरी मिळाली आहे. या प्रकल्पांमुळे परिसरातील पाणीटंचाईवर मात करण्यास मदत होणार आहे.

# दिल्ली स्फोट प्रकरणात सर्वात मोठा खुलासा, फरीदाबादमध्य होती बॉम्ब बनवण्याची फॅक्टरी

**नवी दिल्ली :** दिल्लीत लाल किल्ल्याजवळ मेट्रो स्थानकाच्या बाहेर सोमवारी संध्याकाळी ६ वाजून ५२ मिनिटांनी आत्मघातकी हल्ला झाला. या हल्ल्यात आतापर्यंत १२ जणांचा मृत्यू झाला आहे. तर २४ जण गंभीर जखमी असल्याची माहिती आहे. हा एक दहशतवादी हल्ला होता, असा संशय व्यक्त केला जात आहे. या घटनेप्रकरणी तपास यंत्रणांकडून सखोल तपास केला जात आहे. तसेच पोलिसांकडून ही घटना घडण्याआधी मोठी कारवाई करण्यात आली होती. पोलिसांनी काही संशयितांना ताब्यात घेतलं होतं. तसेच फरिदाबाद येथे स्फोटकं देखील सापडली होती. या प्रकरणी तपास यंत्रणांनी तपास केला असता धक्कादायक माहिती समोर आली आहे.दिल्लीच्या फरिदाबादमध्ये बॉम्ब बनवण्याची फॅक्टरी



होती, असं वृत्त एबीपी माझाने सूत्रांच्या हवाल्याने दिलं आहे. तसेच स्फोटासाठी वापरले जाणारे अमोनिअम नायट्रेटचं गोडाऊनही याच फरिदाबादमध्ये होतं, अशीदेखील माहिती सूत्रांकडून मिळाली आहे. या प्रकरणातला मुख्य आरोपी डॉ. उमर मोहम्मद असल्याची माहिती समोर आली आहे. उमर मोहम्मद फरिदाबादमध्ये राहून डॉक्टर म्हणून प्रॅक्टिसही करायचा आणि दुसरीकडे बॉम्ब बनवण्याची फॅक्टरीदेखील चालवायचा. तो दहशतवादी कारवायांचा कट आखायचा.

त्याच्या बॉम्बच्या फॅक्टरीपर्यंत तपास यंत्रणा पोहोचल्यानंतर मोठा कट उधळला गेला. तसेच उपरने अमोनियम नायट्रेटचं गोडाऊनही फरिदाबादमध्ये बनवलं होतं, असं तपासात समोर आल्याचं सूत्रांचं म्हणणं आहे.डॉ. उमर मोहम्मद हा काश्मीर येथून आला होता. त्याने दौज गावात आपला अड्डा बनवला होता. तिथे खाली दुकानं आणि वरच्या माळ्यावर असणाऱ्या खोल्यांमध्ये बॉम्ब बनवले जायचे. जम्मू काश्मीर पोलीस आणि हरियाणा पोलिसांनी संबंधित ठिकाणी छापा टाकला तेव्हा तिथे टायमर, सर्किट आणि बॉम्ब बनवण्याचे इतर साहित्य मिळाले.आरोपींनी अमोनियम नायट्रेटचा साठा ठेवण्यासाठी फतेहपूर तागा या गावात घर भाड्याने घेतलं. तिथे अम ोनियम नायट्रेट जमा केलं जायचं. जेव्हा बॉम्ब बनवायचा असेल तेव्हा दौज गावात जिथे ते राहायचे तिथे आणलं जायचं. या संपूर्ण घटनेचा मास्टरमाईड हा डॉ. उमर मोहम्मद होता. त्याच्यासोबत मुझम्मील आणि इरफान ही दोन डॉक्टरदेखील होती.या प्रकरणात पोलिसांच्या समोर काही महत्त्वाचे प्रश्न उभे राहिले आहेत. आरोपी डॉ. उमर मोहम्मद हा स्वत: बॉम्ब बनवण्याचं जाणत होता. त्याला ते माहिती होतं. तो मोठा घातपात घडवण्याचा कट आखत होता. पण त्याने काल स्वत: गाडीत बसून हा आत्मघातकी हल्ला का घडवून आणला? त्याला हवं असतं तर तो कालपेक्षाही आणखी जास्त वर्दळीच्या ठिकाणी असा घातपात घडवून आणू शकला असता. मग त्याने काल लाल किल्ला परिसरात एका चौकातच हे कृत्य का केलं? असा प्रश्न पोलिसांसमोर आहे.

## मुलाच्या मृत्यूने आई-वडील खचले ; विरहामध्ये आत्महत्या

**सोलापूर :** सोलापूर जिल्ह्यातील सांगोला तालुक्यात हातीद येथे एक हृदयद्रावक घटना घडली असून वृद्ध दाम्पत्याने आपलं जीवन संपवलं आहे. चार वर्षांपूर्वी झालेल्या अपघातात मुलाचा मृत्यू झाल्याने दुःखात असलेल्या वामन महादेव घाडगे (६२) आणि अनिता वामन घाडगे (५५) यांनी राहत्या घरी लोखंडी अँगलला साडीने गळफास घेऊन आत्महत्या केली. ही घटना सोमवारी दुपारी घडली असून, या घटनेने परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, चार वर्षांपूर्वी वामन घाडगे यांचा लाडका मुलगा आकाश याचा बंगळुरू येथे एका अपघातात दुर्दैवी मृत्यू झाला होता. या घटनेनंतर वामन आणि अनिता घाडगे हे दोघेही खूप खचले होते. मुलाच्या अकाली मृत्यूचं दुःख त्यांना सहन होत नव्हतं आणि ते सतत त्याच्या आठवणीत रडत असत. चार वर्षांपासून वामन घाडगे आणि अनिता घाडगे हे वृद्ध दाम्पत्य कसेबसे आयुष्य जगत होते. लाडक्या आकाशचा अकाली मृत्यू त्यांना सहन



होत नव्हता.सोमवारी दुपारी दीडच्या सुम ारास, त्यांचे मोठे चिरंजीव विकास वामन घाडगे हे ग्रामपंचायतीच्या कामासाठी बाहेर गेले होते. त्यांची पत्नी, म्हणजेच मोठी सून स्वाती घाडगे या चुलत्यांकडे गेल्या होत्या. घरात कोणी नसल्याचं पाहून, वामन आणि अनिता घाडगे यांनी टोकाचं पाऊल उचललं. विकास घरी परतल्यावर त्याने स्वयंपाकघराचे दोन्ही दरवाजे आतून बंद असल्याचे पाहिले. खिडकीतून डोकावल्यावर त्याला धक्काच बसला. त्याचे आई-वडील लोखंडी अँगलला साडीने गळफास घेतलेल्या अवस्थेत दिसले. दरम्यान, या घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. पोलिसांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली असून, सांगोला ग्रामीण रुग्णालयात शवविच्छेदन करण्यात आले.

## दिल्ली स्फोटात अशोकचा दुर्दैवी अंत

**नवी दिल्ली :** दिल्लीच्या लाल किल्ल्याजवळ झालेल्या बॉम्बस्फोटाने संपूर्ण देशाला हादरवून सोडलं आहे. लाल किल्ल्यासारख्या चोख सुरक्षा असलेल्या ठिकाणी इतका मोठा स्फोट झाल्याने संपूर्ण देशाच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. या भयंकर स्फोटात उत्तर प्रदेशातील अमरोहा जिल्ह्यातील रहिवासी अशोक कुमार (३४) यांनाही आपला जीव गमवावा लागला आहे. त्यांच्या या दुःखद मृत्यूने त्यांचे संपूर्ण कुटुंब उद्ध्वस्त झाले आहे. अशोक कुमार हे दिल्लीत बस कंडक्टर म्हणून काम करत होते. अशोक नेहमीप्रमाणे आपले कर्तव्य पूर्ण करून घरी परतत होते, त्यावेळीच हा स्फोट झाला आणि क्षणात होत्याचं नव्हतं झालं.अशोक हे मूळचे अमरोहा जिल्ह्यातील हसनपूर पोलिस स्टेशन हद्दीतील मंगरोला गावातील रहिवासी आहेत. त्यांच्या वडिलांचे आधीच निधन झाले होते आणि आता अशोक हेच त्यांच्या वृद्ध आई आणि कुटुंबातील इतर सदस्यांचा एकमेव आधार होते. या घटनेने फक्त त्यांच्या कुटुंबावरच नाही तर संपूर्ण गावावर शोककळा पसरली आहे.

## निठारी हत्याकांड प्रकरणात १८ वर्षांनंतर सुरेंद्र कोळीची निर्दोष मुक्तता

**नवी दिल्ली :** संपूर्ण संपूर्ण देशाला हादरवून सोडणाऱ्या नोएडाच्यानिठारी हत्याकांडातील एका प्रकरणात सुरेंद्र कोळी याला केलेल्या शिक्षेला आव्हान देणारी क्युरेटिव्ह याचिका सर्वोच्च न्यायालयाने मंगळवारी (११ नोव्हेंबर) मंजूर केली आहे. या निर्णयामुळे सुरेंद्र कोळी आता मुक्त होणार आहे. कारण, त्याला निठारीच्या इतर सर्व प्रकरणांमध्ये आधीच निर्दोष मुक्तता मिळालेली आहे. त्यामुळे आता तब्बल १८ वर्षांनंतर तो तुरुंगातून बाहेर येणार आहे.२९ डिसेंबर २००६ रोजी नोएडाच्या निठारी गावात व्यापारी मोनिंदर सिंग पंढेर यांच्या घरामागील नाल्यात आठ मुलांचे सांगाडे सापडल्यानंतर निठारी हत्याकांड उघडकीस आले होते. या हत्याकांडाने देशात संतापाची लाट उसळली होती.मुख्य न्यायाधीश बीआर गवई आणि न्यायमूर्ती सूर्यकांत आणि विक्रम नाथ यांच्या खंडपीठाने कोळीच्या याचिकेवर ओपन कोर्टमध्ये सुनावणी केल्यानंतर हा निर्णय दिला आहे. कोळीला १५ वर्षांच्या म ुलीवर बलात्कार आणि हत्येप्रकरणी दोषी




ठरवण्यात आले होते आणि फेब्रुवारी २०११ मध्ये सर्वोच्च न्यायालयाने त्याची शिक्षा कायम ठेवली होती. २०१४ मध्ये त्याची पुनर्विचार याचिका फेटाळण्यात आली होती.त्यानंतर जानेवारी २०१५ मध्ये, अलाहाबाद उच्च न्यायालयाने त्याच्या दया याचिकेवर निर्णय देण्यास अवाजवी विलंब झाल्याचे कारण देत त्याची मृत्युदंडाची शिक्षा जन्मठेपेत बदलली होती. ऑक्टोबर २०२३ मध्ये, त्याच न्यायालयाने कोळी आणि पंढेर दोघांनाही निठारीच्या अनेक प्रकरणांम ध्ये निर्दोष मुक्त केले आणि २०१७ मध्ये कनिष्ठ न्यायालयाने सुनावलेली मृत्युदंडाची शिक्षाही रद्द करण्यात आली. कोळीला १२ प्रकरणांमध्ये, तर पंढेरला दोन प्रकरणांमध्ये निर्दोष मुक्तता मिळाली आहे.

# पती आणि आईनेच लावली 'लुटेरी दुल्हन' राणीची डझनभर लग्न

**वारानसी :** रानी कुमारीची 'डॉली-स्टाईल' लग्नफसवणूक, जणू Dolly Ki Doli चा रिमेकच, शेवटी सोनभद्रा पोलिसांनी एक भक्कम कट-टू-एंड करून संपवली आहे. डझनभराहून जास्त लग्नं, प्रत्येक वेळी नवा वर, नवं घर, नवे स्वप्न आणि शेवटी तेच, विवाहमंडपातील दिवे मालवण्याआधीच नववधूचा 'गूढ गायब'. अनेक नवऱ्यांना भावनिकपणे जखमी करून आणि खिसे साफ करून रानीने स्वतःला 'रिअल-लाइफ डॉली'चं टायटल मिळवलं होतं.

Dolly Ki Doli चित्रपटात सोनम कपूरने जसं लग्नानंतर पहाटेच नवऱ्याच्या घरातून गायब व्हायची, तसंच रानीचं 'ऑपरेशन दुल्हन'ही चालायचं, परफेक्ट मेकओव्हर, विश्वास जिंकणारा स्वभाव, घरच्यांशी जवळीक आणि मग अचानक रूममधून, लग्नाच्या मंडपातून किंवा दुसऱ्या दिवशी सकाळीच पलायन. काही तास, कधीकधी एक दिवस, इतकाच तिच्या 'वैवाहिक जीवनाचा' कालावधी होता. या लुटेरी दुल्हणच्या कटात रानीच्या मागे तिची संपूर्ण टीम होती, तिचा पती रवी रंजन मौर्य, आई माया आणि नंतर उघडकीस आलेला चौथा साथीदार



क्रिश्नाचंद मौर्या.या तिघांचा पाठलाग उत्तर प्रदेशमध्ये सुरू होता. अखेर ६-७ नोव्हेंबरदरम्यान पोलिसांनी सापळा रचून रानी, रवी आणि मायाला पकडलं. त्यांच्या तावडीतून ९,५०० रुपये, सोने, चांदी, तसेच लग्नांम ध्ये वापरले जाणारे व्हेल, चोळ्या, दागिने, साड्या जप्त केल्या.

तपासादरम्यान पोलिसांनी रानीकडून तिच्या चौथ्या साथीदाराची माहिती बाहेर काढली. त्यानंतर क्रिश्नाचंद मौर्याला चोरीच्या एसयूव्हीसह आणि तब्बल ९०,००० रुपयांसह अटक केली. मयूरपूर स्टेशन ऑफिसर कमल नयन दुबे यांच्या मते, कृष्णानंद हा या संपूर्ण ऑपरेशनचा 'लॉजिस्टिक मास्टर' होता.

ङ्गतो नकली लग्नं आणि कार्यक्रमांच्या तयारीत मदत करत असे. योग्य कुटुंब निवडून त्यांच्याशी संपर्क साधण्यापासून चोरीच्या वाहनांपर्यंत सर्व व्यवस्था त्याच्याकडे होती,ङ्घ असं दुबे यांनी उघड केलं.तपासकर्त्यांनी उघड केले की राणीने डझनभराहून अधिक लग्ने केली होती, बहुतेकदा ती तिच्या लूटसह गायब होण्यापूर्वी काही तास चालली होती. तिच्या योजना सोनम कपूरच्या 'डॉली की डोली' चित्रपटाच्या कटाचे प्रतिबिंब होते - खऱ्या बळींना तुटलेले हृदय आणि रिकाम्या खिशासह सोडून दिले गेले होते.

# भारतीय संघ टी-20 वर्ल्ड कपसाठी तयार नाही गंभीर यांना टीम इंडियावर भरोसा नाही का?



**मुंबई :** भारतीय संघाने नुकतीच ऑस्ट्रेलियाविरुद्धची टी-२० मालिका जिंकली. भारताचा टी-२० क्रिकेटमधील दबदबा दिवसेंदिवस वाढताना दिसत आहे. आता पुढील वर्षी टी-२० विश्वचषक ही रंगणार आहे. फ्रेबुवारीमध्ये होणाऱ्या स्पर्धेसाठी प्रत्येक संघ जोरदार सराव करत आहे. आता ढशरा खपवळर कसून सराव करत आहे. टीम इंडिया या स्पर्धेसाठी तयार आहे की नाही हे आता प्रशिक्षक Gautam Gambhir यांनी अखेर सांगितले आहे.


भारतीय संघाचे मुख्य प्रशिक्षक गंभीर यांनी सोमवारी स्पष्ट केले की, '२०२६ चा टी-२० विश्वचषक काही महिन्यांवर आला आहे, परंतु संघ अद्याप त्याच्या इच्छित तंदुरुस्तीच्या पातळीवर पोहोचलेला नाही. खेळाडूंना कोणत्या सुधारणांची आवश्यकता आहे याबद्दल बोलले आहे. एक मोठी स्पर्धा आहे आणि जर ते घरच्या मैदानावर खेळत असतील तर सर्वकाही परिपूर्ण असले पाहिजे. ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या टी-२० मालिकेतील विजयानंतर काही तासांतच गंभीर बोलत होते. भारताने मालिका २-१ ने जिंकली, तर अंतिम सामना रद्द झाला. गंभीर प्रशिक्षक झाल्यापासून, भारताने एकही टी-२० मालिका गमावलेली नाही. बीसीसीआयला दिलेल्या मुलाखतीत, संघाच्या पुढील ध्येयांबद्दल विचारले असता, गंभीर म्हणाले, 'सर्वप्रथम, दक्षिण आफ्रिकेविरुद्ध दोन कसोटी सामने आहेत. हे जागतिक कसोटी अजिंक्यपद सामने आहेत आणि ते चांगले खेळत आहेत. आम्हाला माहित आहे की कसोटी चक्र किती महत्त्वाचे आहे; हे दोन्ही सामने खूप महत्वाचे आहेत.' पहिली कसोटी १४ नोव्हेंबरपासून कोलकाता येथील ईडन गार्डन्सवर आणि दुसरी २२ नोव्हेंबरपासून गुवाहाटी येथे खेळली जाईल.गंभीर पुढे म्हणाले, 'नंतर पुढचे मोठे लक्ष टी-२० विश्वचषक असेल, जो घरी खेळला जाईल. माझ्यासाठी, या दोन गोष्टी सर्वात महत्त्वाच्या आहेत, कसोटी आणि टी-२०. मी असे म्हणत नाही की आम्ही ५० षटकांच्या स्वरूपावर लक्ष केंद्रित करणार नाही, परंतु फिटनेसच्या दृष्टिकोनातून, आम्ही अद्याप टी-२० विश्वचषकासाठी जिथे असायला हवे तिथे पोहोचलो नाही.'

गंभीर पुढे म्हणाला, 'मी खेळाडूंना असेही सांगितले आहे की आम्हाला पूर्णपणे तीक्ष्ण, तंदुरुस्त आणि जलद धावणे आवश्यक आहे. आपण जितके तंदुरुस्त असू तितके आपण मानसिकदृष्ट्या बळकट असू. दबावाच्या सामन्यांमध्ये मजबूत शरीर आपले मन बळकट ठेवेल. मला आशा आहे की मुलांना तंदुरुस्तीचे महत्त्व समजेल. आपल्याकडे अजूनही तीन महिने शिल्लक आहेत आणि आपण जिथे पोहोचण्याची गरज आहे तिथे पोहोचू.'

## जडेजानंतर सनरायझर्स हैदराबादचा खेळाडूही सोशल मीडियावरुन गायब; मॅचविनर आहे तरी कोण?

**मुंबई :** आयपीएल २०२६ च्या आधी, रवींद्र जडेजाबाबत चेन्नी सुपर किंग्ज मोठा निर्णय घेण्याच्या तयारीत आहे. चेन्नईकडे संजू सॅमसन जाणार आहे पण त्याबदल्यात राजस्थानला जडेजा आणि सॅम करन सारखे अष्टपैलू खेळाडू हवे आहेत. आता आयपीएलचे रिटेन्शन हे १५ नोव्हेंबरला असणार आहे. आता या चर्चे दरम्यान जडेजाचे इन्स्टाग्राम अकाउंट दिसेनासे झाले आहे. पण फक्त जडेजा नाही तर सनरायजर्स हैदराबादच्या एका खेळाडूचे अकाउंटही गायब झाल्याचे दिसत आहे.

जडेजाची चेन्नई सुपर किंग्जकडून दिल्ली कॅपिटल्समध्ये खरेदी-विक्री केली जाईल अशी चर्चा आहे. दोन्ही फ्रँचायझींमधील या मोठ्या व्यवसाय करारादरम्यान, जडेजा इन्स्टाग्रामवरुन गायब झाला आहे. जडेजाचे इंस्टाग्राम अकाउंट गायब झाले



आहे. जडेजाचे अकाउंट इन्स्टावर सर्च केल्यानंतर दिसत नाही. जडेजाने २५४ आयपीएल सामने खेळले आहेत, जे स्पर्धेच्या इतिहासातील पाचवे सर्वाधिक आहे. तो १४३ विकेटसह सीएसकेचा सर्वाधिक विकेट घेणारा गोलंदाज आहे. जडेजाचा सर्वात संस्मरणीय क्षण २०२३ च्या आयपीएल फायनलमध्ये आला, जेव्हा त्याने गुजरात टायटन्सविरुद्ध शेवटच्या षटकात चौकार मारून आपल्या संघाला विजेतेपद जिंकण्यास मदत केली.चेन्नई संघ जडेजा बाबत मोठा निर्णय घेणार आहे हे याची चर्चा तर मागील काही दिवसांपासून होत आहे. पण सनरायझर्स हैदराबादच्या संघही आपल्या खेळाडूंना सोडण्याचा विचार करत आहे की काय अशी चर्चा रंगली आहे. सनरायझर्स हैदराबादच्या नितीश कुमार रेड्डीच्या बाबतही काही चर्चा रंगल्या आहेत. नितीश रेड्डीचे इन्स्टाग्राम अकाउंटही सर्च केल्यानंतर दिसत नाही. त्यामुळे नितीश कुमार रेड्डीबाबतही हैदराबाद संघ मोठा निर्णय घेण्याच्या तयारीत असल्याते म्हटले जात आहे.भारतीय संघासाठी नितीशने तिन्ही फॉरमेटमध्ये डेब्यू केले आहे. ऑस्ट्रेलियाविरुद्ध मालिकेत एकदिवसीय सामन्यात त्याला पर्दापण मिळाले. हार्दिक पंड्याच्या दुखापतीमुळे त्याला संघात जागा मिळाली.

## हातात स्पीकर घेऊन रोहित खिडकी जवळ आला अनब नाचू लागला

**मुंबई :**रोहित शर्माचा एक व्हिडिओ जोरदार व्हायरल होत आहे. रोहितचा हा व्हिडिओ व्हायरल होण्यमागे कारणही तसेच आहे. आता असाच आणखी एक व्हिडिओ समोर आला आहे. या व्हिडिओमध्ये, रोहित त्याच्या खोलीच्या खिडकीबाहेर उभे असलेल्या वधू-वरांना अनोख्या पद्धतीने अभिनंदन करताना दिसत आहे ज्यामुळे तुम्हाला हसायला येईल. दक्षिण आफ्रिकेच्या क्रिकेट संघाविरुद्धच्या एकदिवसीय मालिकेसाठी जोरदार तयारी करणाऱ्या रोहितचा हा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल होत आहे.रोहितचा व्हायरल व्हिडिओ त्याच्या वर्कआउट सेशनमधील असल्याचे बोलले जात आहे. त्याच्या वर्कआउट दरम्यान, रोहितने खिडकीतून बाहेर पाहिले आणि एका नवविवाहित जोडप्याचे लग्नाचे फोटोशूट



करताना पाहिले. अचानक रोहितने त्याच्या स्पीकरवर आज मेरे यार की शादी है गाणे वाजवले. रोहित खिडकीजवळ उभा राहिला आणि नाचू लागला. जेव्हा वधू-वर हे पाहतात तेव्हा त्यांनाही असाच आनंद होतो.दक्षिण आफ्रिकेविरुद्ध तीन सामन्यांची एकदिवसीय मालिका ३० नोव्हेंबर रोजी रांचीमध्ये सुरू होणार आहे, त्यातील पहिला सामना ३ डिसेंबर रोजी रायपूर आणि ६ डिसेंबर रोजी विशाखापट्टणममध्ये खेळला जाईल.

## भारतविरुद्ध दक्षिण आफ्रिका मालिका कुठे, किती आणि कधी खेळवली जाणार?

**मुंबई :** ऑस्ट्रेलिया दौऱ्यातील दमदार कामगिरीनंतर, टीम इंडिया आता दक्षिण आफ्रिकेविरुद्ध घरच्या मैदानावर दोन साम न्यांची कसोटी मालिका खेळण्यासाठी सज्ज झाली आहे. ही मालिका १४ नोव्हेंबरपासून सुरू होत आहे, जिथे शुभमन गिलच्या नेतृत्वाखालील भारतीय संघ वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिपचा सामना करेल. २०२५-२७ वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिप लक्षात घेता दोन्ही संघांसाठी ही मालिका महत्त्वाची आहे. भारतीय संघ टॉप टूमध्ये स्थान मिळवण्याचे ध्येय ठेवेल.भारत आणि दक्षिण आफ्रिका यांच्यातील कसोटी मालिकेचा पहिला साम ना १४ नोव्हेंबर रोजी कोलकाता येथील ऐतिहासिक ईडन गार्डन्स स्टेडियमवर खेळला जाईल. सामना भारतीय वेळेनुसार सकाळी ९:३० वाजता सुरू होईल. सामन्याच्या अर्धा तास आधी, सकाळी ९ वाजता टॉस होईल. मालिकेतील दुसरा सामना गुवाहाटीतील बरसापारा क्रिकेट स्टेडियमवर खेळला जाईल. हा सामना २२ नोव्हेंबरपासून सुरू होईल. आतापर्यंत कसोटी क्रिकेटमध्ये भारत आणि दक्षिण आफ्रिकेदरम्यान ४४ कसोटी सामने खेळले गेले आहेत. दक्षिण आफ्रिकेने यापैकी १८ सामने जिंकले आहेत, तर भारताने १६ सामने जिंकले आहेत. दुसरीकडे, भारतात दोन्ही संघांमध्ये एकूण १९ कसोटी सामने खेळले गेले आहेत. भारताने यापैकी ११ साम ने जिंकले आहेत, तर दक्षिण आफ्रिकेने फक्त पाच सामने जिंकले आहेत. तीन कसोटी साम ने अनिर्णित राहिले आहेत. दक्षिण आफ्रिकेने २०१० मध्ये घरच्या मैदानावर भारताला शेवटचा कसोटी सामना जिंकला होता. याचा अर्थ दक्षिण आफ्रिकेने १५ वर्षांपासून भारतात एकही कसोटी सामना जिंकलेला नाही.भारत: शुभमन गिल (कर्णधार), ऋषभ पंत, यशस्वी जयस्वाल, केएल राहुल, साई सुदर्शन, देवदत्त पडिक्कल, ध्रुव जुरेल, रवींद्र जडेजा, वॉशिंग्टन सुंदर, जसप्रीत बुमराह, अक्षर पटेल, नितीश कुमार रेड्डी, मोहम्मद सिराज, कुलदीप यादव, आकाश दीप.

दक्षिण आफ्रिका: टेम्बा बावुमा (कर्णधार), कॉर्बिन बॉश, डेवाल्ड ब्रेविस, टोनी डी झोर्झी, झुबेर हमझा, सायमन हार्मर, मार्को जॅन्सन, केशव महाराज, एडन मार्करम, विआन म ुल्डर, सेनुरन मुथुसामी, कागिसो रबाडा, रायन रिकेल्टन, ट्रिस्टन स्टब्स, काइल वेरिन



# हजारो मुलांना जीवदान देणाऱ्या पलक मुच्छलच्या कार्याची गिनीज बुक ऑफ रेकॉर्डकडून दखल

**चेन्नई :** बॉलिवूडची प्रसिद्ध पार्श्वगायिका पलक मुच्छल हिने केवळ आपल्या मधुर आवाजाने नव्हे तर सामाजिक कार्यानेही जगभरात आपली ओळख निर्माण केली आहे. अल्पवयातच हजारो गरजू बालकांच्या हृदयशस्त्रक्रियांसाठी आर्थिक मदत करून पलकचं नाव आता 'गिनीज वर्ल्ड रेकॉर्ड्स' मध्ये नोंदवलं गेलं आहे.

पलकने आजवर ३,८०० हून अधिक मुलांच्या हृदयशस्त्रक्रियांसाठी निधी उभारला आहे. तिच्या 'पलक मुच्छल फाउंडेशन'च्या माध्यमातून गेली अनेक वर्षं ती या कार्यात झटत आहे. इंदूरमध्ये जन्मलेल्या पलकला लहानपणी रेल्वे प्रवासादरम्यान काही गरीब मुलांना मदतीची गरज असल्याचं दिसलं आणि त्याच क्षणापासून तिने ठरवलं ङ्गमी मोठी झाल्यावर यांच्यासाठी काहीतरी करणारच!

या संकल्पनेवर ठाम राहून पलकने आपल्या प्रत्येक संगीत कार्यक्रमातून मिळणारे मानधन आणि कमाई थेट हृदयशस्त्रक्रियांसाठी वापरले. तिने फक्त मुलांच्या शस्त्रक्रियांसाठीच नव्हे, तर






कारगिल शहीदांच्या कुटुंबांना मदत आणि गुजरात भूकंप पीडितांसाठी १० लाखांची देणगी दिली आहे. लोकप्रियतेच्या शिखरावर असतानाही पलकने सेवा कार्य कधीच थांबवले नाही. 'मेरी आशिकी, कौन तुझे, प्रेम रतन धन पायो' यांसारखी हिट गाणी देणाऱ्या या गायिकेने नेहमीच सांगितलं आहे की, ङ्गमाझा आवाज केवळ संगीतासाठी नाही, तर जीवनासाठी आहे. तिचे पती आणि संगीतकार मिथुन यांनीही या प्रवासात तिची साथ दिली आहे.

पलकचं नाव आधीच लिम्का बुक ऑफ रेकॉर्ड्स मध्ये नोंदले गेले होते आणि आता गिनीज वर्ल्ड रेकॉर्डमध्ये समावेश होऊन तिच्या कार्याचे कौतुक जागतिक स्तरावर होत आहे. संगीताच्या माध्यमातून समाजासाठी झटणाऱ्या पलक मुच्छलने दाखवून दिलं आहे की प्रसिद्धीचा खरा अर्थ फक्त यश नसून ती दुसऱ्यांच्या आयुष्यात प्रकाश आणण्याची शक्ती आहे. पलकचा हा प्रवास हजारो बालकांच्या हृदयाला नवजीवन देणारा ठरला आहे.



# 'बॉर्डर २'मधील वरुणचा फर्स्ट लुक समोर



**मुंबई :** 'बॉर्डर २' चित्रपटातील वरुण धवनचा फर्स्ट लुक सादर करण्यात आला आहे. हा फर्स्ट लुक सोशल मीडियावर व्हायरल झाला आहे. यापूर्वी निर्मात्यांनी चित्रपटातील सनी देओलचा फर्स्ट लुक शेअर केला होता. हा चित्रपट २३ जानेवारी रोजी प्रदर्शित होणार आहे.

'देशाचा शिपाई पीव्हीसी होशियार सिंह दहिया' अशी पॅप्शन वरुण धवनने चित्रपटातील स्वत:चा लुक शेअर करत दिली आहे. या पोस्टरमध्ये वरुण हा सैन्याच्या गणवेशात असून त्याच्या हातात बंदुक आहे. आसपास इतर शिपाई असून ज्यातील काही जखमी आहेत, तर काही युद्ध लढत आहेत. या चित्रपटात सनी देओल, वरुण धवन, दिलजीत दोसांझ, अहान शेट्टी, मेधा राणा, मोना सिंह, सोनम बाजवा हे कलाकार दिसून येणार आहेत. तर दिग्दर्शन अनुराग सिंह यांनी केले आहे. भूषण कुमार, कृष्ण कुम ार, जेपी दत्ता आणि निधी दत्ता यांनी या चित्रपटाची निर्मिती केली आहे. 'बॉर्डर' चित्रपट १९९७ साली प्रदर्शित झाला होता, चित्रपट १९७१ च्या युद्धातील 'बॅटल

ऑफ लोंगेवाला'वर आधारित होता. त्या चित्रपटात सनी देओल, जॅकी श्रॉफ, सुनील शेट्टी, अक्षय खन्ना, पुनीत इस्सर, सुदेश बेरी आणि कुलभूषण खरबंदा हे कलाकार होते. तब्बू, पूजा भट्ट, राखी गुलझार, शरबनी मुखर्जी आणि सपना बेदी या अभिनेत्रीही दिसून आल्या होत्या.

# गोविंदाची प्रकृती अचानक बिघडली

**मुंबई :** बॉलिवूडमधून अजून एक धक्कादायक बातमी समोर आली आहे. गोविंदाची प्रकृती अचानक बिघडली असून त्याला रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. काल रात्री मंगळवारी (११ नोव्हेंबर) रात्री ८ वाजता गोविंदाची प्रकृती अचानक बिघडली. त्याला मुंबईतील जुहू परिसरातील रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

मीडिया रिपोर्टनुसार, Disorientation मुळे गोविंदा यांची तब्येत अचानक बिघडली. त्यानंतर डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार त्याला औषधे देण्यात आली आणि पहाटे १ च्या सुमारास त्यांना रुग्णालयात दाखल करण्यात आले. त्याच्या अनेक वैद्यकीय चाचण्या झाल्या आहेत, ज्याचे निकाल येणे बाकी आहेत. गोविंदा ६१ वर्षांचे आहेत. गोविंदा अचानक बेशुद्ध पडल्यावर त्यांना रुग्णालयात नेण्यात आले. बुधवारी अभिनेता गोविंदा यांना मुंबईतील क्रिटीकेअर हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले. सध्या त्यांच्यावर उपचार सुरू आहे. गोविंदाला रुग्णालयात दाखल केल्याची बातमी समजताच चाहते चिंतेत दिसत आहे. तसेच गोविंदा लवकरच बरा व्हावा याची प्रार्थना करताना दिसत आहेत.



अलिकडेच गोविंदा त्यांच्या वैयक्तिक आयुष्यामुळे चांगलेच चर्चेत होते. गोविंदा आणि त्यांची पत्नी सुनीता आहुजा यांचा घटस्फोट झाल्याची चर्चा सोशल मीडियावर रंगली होती. तसेच ते 'टू मच' या काजोल आणि ट्विंकल खन्नाच्या शोमध्ये देखील दिसले होते. चाहते आता गोविंदा यांच्या आगामी प्रोजेक्टची उत्सुकतेने वाट पाहत आहेत.

# २५ डिसेंबरला येणार कार्तिक-अनन्याची लव्हस्टोरी



**भोपाल :** चित्रपट 'तू मेरी मैं तेरा मैं तेरा तू मेरी'मधून अनन्या पांडे आणि कार्तिक आर्यन चालू वर्षात प्रेक्षकांचे मनोरंजन करणार आहेत. समीर विध्वंस यांच्या दिग्दर्शनातील आणि धर्मा प्रॉडक्शनच्या सहकार्याने निर्मित रोमँटिक चित्रपटाची प्रदर्शनाची तारीख समोर आली आहे. कार्तिकने स्वत:च्या इन्स्टाग्राम हँडलवर या चित्रपटाचे पोस्टर शेअर केले आहे. या पोस्टरमध्ये अनन्या आणि कार्तिक दोघेही एकत्र अत्यंत आनंदी दिसून येत आहेत, याचबरोबर कॅप्शनमध्ये 'मी पुन्हा येतोय, यावेळी २५ डिसेंबरला' असे नमूद करण्यात आले आहे. कार्तिक आर्यन आणि अनन्या या चित्रपटाच्या निमित्ताने दुसऱ्यांदा एकत्र आले आहेत. यापूर्वी दोघांनी २०१९ मध्ये 'पती पत्नी और वो' चित्रपटात एकत्र काम केले होते.

त्या चित्रपटात भूमी पेडणेकरही मुख्य भूमिकेत होती. 'तू मेरी मैं तेरा मैं तेरा तू मेरी' चित्रपटात कार्तिक आणि अनन्यासोबत जॅकी श्रॉफ आणि नीना गुप्ता महत्त्वाच्या भूमिकेत आहे. या चित्रपटाला बॉक्स ऑफिसवर अगस्त्य नंदाचा चित्रपट 'इक्कीस'सोबत स्पर्धा करावी लागणार आहे.

# ...पोह्याचे कटलेट....




साहित्य १ वाटी जाड पोहे, अर्धा वाटी ओला वटाणा, अर्घा वाटी कोबी बारीक चिरलेली, पाव वाटी गाजर बारीक किसलेले, पाव वाटी बिन्स तुकडे, हळद, तिखट, मीठ, लसूण पेस्ट १ चमचा आले पेस्ट १ चमचा, १ चमचा हिरवी मिरची जाड दळलेली चवीप्रमाणे मीठ, फोडणीसाठी, जीरे मोहरी हिंग, १ कांदा बारीक चिरलेली, १ चमचा लिंबू रस, अर्धा वाटी कोथींबिर बारीक चिरलेली अर्धा वाटी ओलं नारळ, तळण्यासाठी तेल.

कृती प्रथम कढईत ३ टेबल स्पून तेल घालून, जीरे, मोहरी, फोडणी करावी त्यात बारीक चिरलेला कांदा घालावा. २ मिनटे परतावा (वरील सर्व भाज्या मिठाच्या पाण्यात उकळून घ्याव्यात.) त्यात कांद्यात आलं लसूण हिरवी मिरची पेस्ट घालावी. तिखटमीठ, हळद १ मीनीट परतावे, घालावे. कळलेल्या सर्व भाज्या घालाव्या परतावे, चवीप्रमाणे मीठ, लिंबू रस घालावा कोथींबिर घालावी भाजी थंड करण्यास ठेवावी. त्यानंतर पोहे मिक्सरमध्ये जाडसर दळून पीठ करावे हे पीठ तयार भाजीत घालून त्याला एक जीव करावे. लिंबा एवढा गोळा घेऊन कटलेट आकार देऊन गुलाबी रंगावर कटलेट तळून घ्यावेत. चटणी सोबत किंवा सॉस सोबत सर्व्ह करावे. गरमच खाण्यास द्यावेत.

साहित्य १ वाटी तांदुळ, एक वाटी जाड रवा, मीठ, १ चमचा आलं मिरची पेस्ट तेल. कृती- प्रथम तांदुळ २ ते ३ तास भिजवावे, रवा १ तास भिजवावा.

**निर डोसा**

पाणी बदलून घ्यावे. तांदुळ प्रथम मिक्सरमधून दळून घ्यावा. थोडा जाडसर, त्यानंतर रवाना सुध्दा दळून घ्यावा. दोन्ही पेस्ट कराव्यात. मीठ घालावे. १ तास राहू द्यावे (हे मिश्रण पातळ असावे घट्ट नको आहे.) तव्यावर तेल घालावे व डोसा घालावा. डोसाचे पीठ तव्यावर थोडे अंतर ठेवूनच घालावे तो आपोआप तव्यावर पसरेल या बेतानेच घालावा. दोन्ही बाजूने शेकावा हा डोसा नरमच असतो. कडक करु नये. सांबर किंवा दह्याच्या पातळ चटणी सोबत गरमागरम खाण्यास द्यावा.

**अनंताभाऊ देशपांडे बुलढाणा**

# ...गुळाचा खमंग सोजा..



साहित्य- दोन वाट्या गव्हाचा जाडसर दळलेला रवा सोजी, पण चालेल दिड वाटी बारीक चिरलेला गावरान गुळ, १ चमचा जायफळ पुड, अर्धा चमचा सुंठपुड, अर्धा वाटी तुप, थोडा बदाम किंवा चारोळी. कृती- प्रथम कढइत तुप घालून सांजा मंद आचेवर खमंग घालून पाण्याला उकळी आणावी पाण्यात भाजलेल्या सांजा घालून मंद आचेवर शिजवावा, झाकण घालून दणदणीत वाफ आणावी थोडा मोकळा झाला की जायफळ पूड, सूंठ पुड, चारोळी घालावी सांज्याची मुद तयार करून ओले खोबरे घालून गरमागरम स्वर्ह करावा.बिटाची रंगीत खीर- साहित्य १ लिटर दूध, २ बीटाचा कीस, १ चमचा विलायची पूड,काजू,बदाम काप आर्धा वाटी, बेदाणा आवडीप्रमाणे २ ते३ चमचे तुप.कृती-प्रथम कढईत तुप घालून बीट किस परतवून थोडा कोरडा करावा १ लिटर दूध थोडे आटवून घ्यावे उकळी आणावी काजू काप बदाम काप व बेदाणा घालावा. वेलाची पूड घालावी. आवडत असल्यास थोडा रवा भाजून घालावा

**अनंताभाऊ देशपांडे बुलढाणा**

# बुलढाण्यात जिल्हास्तर युवा महोत्सवाला उत्स्फूर्त प्रतिसाद

**जनसंचलन/बुलढाणा**

जिल्हास्तर युवा महोत्सव आयोजन समिती, जिल्हा क्रीडा परिषद व जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय बुलढाणा यांच्या संयुक्त विद्यमाने जिल्हास्तर युवा महोत्सव जिल्हा क्रीडा संकुल, जांभरुन रोड, बुलढाणा येथे उत्साहात पार पडला. विविध कला, क्रीडा व सांस्कृतिक क्षेत्रातील युवकांनी या महोत्सवात उत्स्फूर्त सहभाग नोंदवून आपल्या कलागुणांचे दर्शन घडविले. महोत्सवाचे औपचारिक उद्घाटन दि. ६ नोव्हेंबर रोजी सकाळी करण्यात आले. यावेळी विविध सांस्कृतिक कार्यक्रम लोकनृत्य, लोकगीत, कथालेखन, काव्यलेखन, पोस्टर स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा, विज्ञान मेळावा आदींचे आयोजन करण्यात आले. या महोत्सवातील विजेते स्पर्धक अमरावती विभागीय युवा महोत्सवात बुलढाणा जिल्ह्याचे प्रतिनिधित्व करतील.कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून अपर जिल्हा पोलीस अधीक्षक अमोल गायकवाड उपस्थित होते. प्रमुख अतिथी म्हणून जिल्हा शल्य चिकित्सक दत्तात्रय बिराजदार, सेवानिवृत्त कर्मचारी अजयसिंह राजपूत, जिल्हा युवा अधिकारी उपस्थित होते. अमोल गायकवाड यांनी स्वामी विवेकानंदांच्या विचारांचा संदर्भ देत युवकांमध्ये संयम, तळमळ, तेज, आदर, देशप्रेम आणि नशापासून दूर राहण्याचे गुण असणे आवश्यक असल्याचे प्रतिपादन केले. त्यांनी मोबाईल आणि मादक पदार्थांपासून दूर राहून देश, समाज आणि कुटुंबाच्या प्रगतीसाठी योगदान देण्याचे आवाहन केले. अजयसिंह राजपूत यांनी शासनाने उपलब्ध करून दिलेल्या या व्यासपीठाचा लाभ घेऊन सर्व स्पर्धकांनी आपली कला सादर करण्याचे आवाहन केले. तर दत्तात्रय बिराजदार यांनी प्रत्येक स्पर्धा ही जीवनाचा भाग असल्याचे सांगत युवकांना उत्कृष्टतेसाठी सतत प्रयत्नशील राहण्याचा संदेश दिला. प्रास्ताविक जिल्हा क्रीडा अधिकारी बी. एस. महानकर यांनी केले. त्यांनी युवा महोत्सवाचा उद्देश स्पष्ट करताना युवकांना त्यांच्या सुप्त कलागुणांना वाव देण्याचे आणि बुलढाणा जिल्ह्याचे नाव विभागीय, राज्य व राष्ट्रीय स्तरावर उज्वल करण्याचे आवाहन केले. महोत्सवाच्या यशस्वी आयोजनासाठी परीक्षक म्हणून टिळक क्षिरसागर, गजानन लोहटे, वैभव वाघमारे, डॉ. सुभाष चिंचोले, डॉ. सिध्देश्वर नवलाखे, डॉ. मनिषा राऊत, डॉ. संगिता पवार, वैशाली तायडे, एकनाथ इंगळे, विक्रम धावंजेवार, अमर चिंतळे, धनंजय महितकर, सुभाष देशमुख आदींनी कार्य केले. कार्यक्रमाचे संचलन गजेंद्रसिंह राजपूत यांनी तर आभार प्रदर्शन रविंद्र धारपवार यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी उज्वला लांडगे, मनोज श्रीवास, विनोद गायकवाड, भिमराव पवार, सुहास राऊत आदींनी विशेष परिश्रम घेतले.

# भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजना ३० नोव्हेंबरपर्यंत अर्ज मागविले...




**जनसंचलन/बुलढाणा**

अनुसूचित जाती व नवबौद्ध प्रवर्गातील ज्या विद्यार्थ्यांना शासकीय वसतिगृहात प्रवेश मिळालेला नाही, अशा विद्यार्थ्यांना भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजना सुरु केलेली आहे. योजनेंतर्गत इच्छुक विद्यार्थ्यांकडून ३० नोव्हेंबरपर्यंत ऑनलाईन अर्ज मागविण्यात आले आहे. अनुसूचित जाती व नवबौद्ध प्रवर्गातील ११ वी, १२ वी व त्यानंतरचे व्यावसायिक तसेच बिगर व्यावसाईक अभ्यासक्रमात शिक्षण घेत असलेले, सामाजिक न्याय विभागाच्या शासकीय वसतिगृह प्रवेशासाठी अर्ज केलेले व शासकीय वसतिगृह प्रवेश प्रक्रियेनंतर वस्तीगृहामध्ये प्रवेश न मिळालेल्या विद्यार्थ्यांसाठी भोजन, निवास, शैक्षणिक साहित्य, निर्वाह भत्ता व इतर आवश्यक सोयी-सुविधा स्वत: उपलब्ध करुन घेण्यासाठी आवश्यक रक्कम विद्यार्थ्यांच्या आधार संलग्न बँक खात्यात थेट जमा करण्यासाठी भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजना सुरु करण्यात आलेली आहे. जिल्ह्यातील अनुसूचित जाती व नवबौध्द प्रवर्गातील जिल्हा स्तरावर व तालुका स्तरावर शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांनी स्वाधार योजनेच्या निकषानुसार शैक्षणिक वर्ष २०२५-२६ करीता ऑनलाईन पध्दतीने ://.. या संकेतस्थळावर अर्ज करणे करणे आवश्यक आहे. मागील शैक्षणिक वर्षात स्वाधार योजनेकरीता अर्ज केलेल्या विद्यार्थ्यांनी सुध्दा योजनेच्या निकषाप्रमाणे अर्ज करणे आवश्यक आहे. स्वाधार योजनेसाठी आवश्यक असलेल्या कागदपत्रांची यादी कार्यालयातील सुचना फलकावर लावण्यात आलेली असून विद्यार्थ्यांनी अर्जासोबत सर्व आवश्यक कागदपत्रे जोडणे आवश्यक आहे. अर्ज भरतांना काही तांत्रिक अडचणी येत असल्यास सहाय्यक आयुक्त,समाज कल्याण,बुलढाणा येथे संपर्क साधावा, असे आवाहन समाज कल्याण विभागाचे सहाय्यक आयुक्त मनोज मेरत यांनी केले आहे.



# हंगामानुसार शिफारस केलेल्या बियाण्यांची विक्री करा - जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी यांचे आवाहन

जनसंचलन/बुलढाणा



जिल्ह्यातील सर्व कृषी केंद्र संचालकांनी बियाणे कायद्याचे पालन करून केवळ त्या-त्या हंगामासाठी शिफारस केलेल्या बियाण्यांचीच विक्री करावी, असे आवाहन जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी मनोजकुमार ढगे यांनी केले आहे. खरीप, रब्बी किंवा इतर विशिष्ट हंगामासाठी शिफारस केलेले बियाणे केवळ त्या शिफारस केलेल्या हंगामातच विक्रीसाठी ठेवावे. हंगामाबाह्य बियाण्यांची विक्री पूर्णपणे टाळावी. खरीप किंवा लेट खरीप हंगामासाठी शिफारस केलेले कांदा () किंवा इतर बियाणे रब्बी हंगामात विक्रीस ठेवू नयेत. त्याचप्रमाणे, रब्बी हंगामासाठी शिफारस केलेले मका () किंवा ज्वारी (/) बियाणे रब्बी हंगाम संपल्यानंतर विक्रीस ठेवू नयेत, असेही निर्देश देण्यात आले आहेत. कृषी केंद्र संचालकांनी हंगामबाह्य बियाणे विक्रीसाठी कंपन्यांकडून खरेदी करणे तात्काळ थांबवावे. शेतकऱ्यांनी अशा बियाण्यांची खरेदी केल्यामुळे नुकसान झाल्यास संबंधित कृषी केंद्र संचालक यांना जबाबदार धरले जाईल. त्यांच्या विरोधात बियाणे कायद्यानुसार कठोर प्रशासकीय आणि कायदेशीर कारवाई करण्यात येईल, असा इशारा जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी यांनी दिला आहे. जिल्ह्यातील शेतकऱ्यांना योग्य हंगामात योग्य बियाणे उपलब्ध व्हावेत आणि त्यांच्या हिताचे रक्षण व्हावे यासाठी ही सूचना जारी करण्यात आली असून सर्व कृषी केंद्र संचालकांनी या सूचनेची अंमलबजावणी त्वरित व काटेकोरपणे करावी, असे आवाहन करण्यात आले आहे.

# मिशन परिवर्तन अंतर्गत निबंध, चित्रकला स्पर्धेत प्रबोधन विद्यालयाच्या विद्यार्थ्यांचे यश

जनसंचलन/ बुलढाणा

बुलढाणा जिल्हा पोलिस दल आणि बुलढाणा जिल्हा पत्रकार संघातर्फे मिशन परिवर्तन अंतर्गत नशामुक्ती विषयाला घेऊन ऑगस्ट-सप्टेंबर २०२५ मध्ये झालेल्या निबंध-चित्रकला स्पर्धेचा बक्षीस वितरण समारोह प्रभा हॉल, पोलिस मुख्यालय, येथे आयोजित करण्यात आला होता. या स्पर्धेत जिल्हयातील शाळा, महाविद्यालयातील जवळपास ८ हजार विद्यार्थ्यांनी भाग घेतला होता. या स्पर्धेत प्रबोधन विद्यालयाच्या तिन विद्यार्थ्यांनी चित्रकला व निबंध स्पर्धेत पारितोषिके मिळवली. श्रेयश जाधव या इयत्ता पाचवीच्या विद्यार्थ्यांने वर्ग ५ ते ७ गटातून चित्रकला स्पर्धेत जिल्ह्यातून प्रथम क्रमांक मिळविला त्याला ५ हजार रूपये रोख, प्रमाणपत्र व सन्माचिन्ह देऊन गौरविण्यात आले. उदय गुळवे या इयत्ता दहावीतील विद्यार्थ्यांनी वर्ग ८ ते १० गटातून चित्रकला स्पर्धेत द्वितीय क्रमांक मिळविला त्याला २ हजार




रूपये रोख प्रमाणपत्र व सन्माचिन्ह तर तेजल गावंडे या इयत्ता नववी च्या विद्यार्थीने निबंध स्पर्धेत प्रोत्साहनपर बक्षिस मिळविले तिला ५०० रूपये रोख प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह पोलिस अधिक्षक निलेश तांबे, अप्पर पोलिस अधिक्षक अमोल गायकवाड व पत्रकार संघाचे अध्यक्ष रणजीत राजपूत यांच्या हस्ते देऊन गौरविण्यात आले. त्याबद्दल प्रबोधन विद्यालयाच्या वतीने मुख्याध्यापक चंद्रकांत जोशी यांच्या हस्ते तिनही विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. या यशाबद्दल त्यांचे सर्वत्र कौतुक होत आहे.

# शिंदेसेनेत प्रवेश घेतलेल्या अनंता शिंदेंवर अॅट्रॉसिटी, विनयभंगाचा गुन्हा दाखल

जनसंचलन/बुलढाणा



अलीकडेच भाजपमधून बाहेर पडत शिंदेसेनेत प्रवेश केलेले आणि भाजप जिल्हाध्यक्षांवर गंभीर आरोप करणारे अनंता शिंदे पुन्हा एकदा चर्चेत आले आहेत. महिलांशी गैरवर्तन आणि जातीवाचक वक्तव्य केल्याच्या आरोपावरून शिंदे विरोधात बुलढाणा शहर पोलिसांनी अॅट्रॉसिटी आणि विनयभंगाचा गुन्हा दाखल केला आहे. पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, अनंता शिंदे यांची ए.एस.एस. क्रिएशन नावाची कंपनी शहरातील संगम चौकात कार्यरत आहे. या कंपनीच्या माध्यमातून प्रॉडक्ट विक्रीचे काम चालते. जळगाव जिल्ह्यातील तीन महिला विक्री प्रतिनिधी सोमवारी सकाळी या कार्यालयात भेटीसाठी आल्या होत्या. त्यावेळी झालेल्या संभाषणादरम्यान शिंदे यांनी कामाच्या मोबदल्यात अयोग्य मागणी केल्याचा आरोप महिलांनी तक्रारीतून केला होता.




# शेतकऱ्यांसाठी लढणे हे पुण्याचं काम रविकांत तुपकर

## जातीसाठी लढता, आता मातीसाठी लढा! तुपकरांचा एल्गार..!

जनसंचलन/बुलढाणा

मलकापूर तालुक्यातील बेलाड येथे आज क्रांतिकारी शेतकरी संघटना द्वारा आयोजित एल्गार सभेत शेतकरी नेते रविकांत तुपकर यांनी सरकारच्या शेतकरी विरोधी धोरणांवर जोरदार हल्ला चढवत शेतकऱ्यांच्या हक्कासाठी तीव्र लढ्याचा इशारा दिला. शेतकऱ्यांच्या खिशात पैसा आला की बाजारात पैसा येतो. शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर लढणे हे पुण्याचं काम आहे. शेतकऱ्यांच्या आत्महत्या थांबवण्यासाठी, कितीही संकटं आली तरी आम्ही लढत राहू,असे तुपकर म्हणाले. ते पुढे म्हणाले, शेतकऱ्यांवर झालेलं कर्ज हे सरकारच्या चुकीच्या धोरणांचं फळ आहे. मी आमदार, खासदार नाही झालो तरी चालेल, पण शेतकऱ्यांच्या चेहऱ्यावरचा आनंद हेच माझं सर्वोच्च प्राधान्य आहे.फ्फ तुपकर यांनी शेतकऱ्यांना एकजुटीचं आवाहन करताना म्हटलं, शेतकऱ्यांनो, तुमच्या अंगावर कोणतंही संकट आलं तरी एकजूट ठेवा. एकजुटीची ताकद मोठी असते. पंजाबच्या शेतकऱ्यांप्रमाणे प्रदीर्घ लढ्याची तयारी ठेवा. जातीसाठी जसं लढता, तसं आता मातीसाठी लढा.फ्फ सरकारवर टीका करताना ते म्हणाले, ङ्ख्सोयाबीन आणि कापसाचे भाव देणे ही सरकारची जबाबदारी आहे. सोयाबीनचे भाव सोयापेंड निर्यातीवर अवलंबून आहेत, म्हणून निर्यातीला प्रोत्साहन दिलं पाहिजे. पश्चिम महाराष्ट्रातील ऊस उत्पादक शेतकरी जसे संघटित आहेत, तसे विदर्भातील शेतकरीही संघटीत झाले पाहिजेत.फ्फ शेतकरी वर्गातील वाढत्या असंतोषाचा उल्लेख करताना त्यांनी इशारा दिला की, शेतकऱ्यांची पोरांची आज लग्न होत नाहीत, शेतकरी संकटात आहेत. उद्या त्यांच्या संतापाचा उद्रेक झाला आणि मंत्र्यांच्या गाड्या फोडल्या, तर त्यात नवल वाटू नये.फ्फ ङ्ख्देशाचं स्वातंत्र्य आंदोलनातून मिळालं, तसेच शेतकरी प्रश्नही आंदोलनातूनच सुटणार आहेत. मत मागणाऱ्या उमेदवारांना विचारलं पाहिजे तुम्ही किती वेळा शेतकऱ्यांसाठी आंदोलन केलं?फ्फ असा प्रश्न तुपकर यांनी उपस्थित केला. ङ्ख्मागील वर्षी शेतकऱ्यांसाठी लाठीचार्ज झाला तरी आम्ही मागे हटलो नाही. शेतकऱ्यांचा हक्काचा पिकविमा घेतलाच,फ्फ असं सांगत तुपकर यांनी शेतकऱ्यांच्या प्रश्नांवरील आपल्या वचनबद्धतेची पुनरुज्जीवित घोषणा केली. या एल्गार सभेला परिसरातील शेतकऱ्यांची मोठी उपस्थिती लाभली होती . कार्यक्रमाच्या आयोजनाची जबाबदारी अमोल राऊत सचिन शिंगोटे यांसह अन्य पदाधिकारी कार्यकर्ते यांनी पार पाडली